डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ●फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

# प्रेस नोट

दि. ०५/०४/२०१७

**कृपया प्रसिद्धीसाठी**

## महाराष्ट्र राज्याच्या यादीतील 59 अनुसूचित जातीचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक (सर्वांगीण) अभ्यास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने व मा. राजेशजी ढाबरे, महासंचालक, बार्टी यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र राज्याच्या यादीतील 59 अनुसूचित जातींचा सर्वांगीण अभ्यास – संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. अनुसूचित जातीच्या यादीतील अनेक जातीसंदर्भातील संदर्भ साहित्य उपलब्ध नसून विविध निर्देशाकांच्या आधारे या जातींचे संशोधन यापूर्वी करण्यात आलेले नाही. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रामध्ये या जातींचे ठळक योगदान दिसून येत नाही. ( उदा. दक्कल, अगेर, गंडा तुरी, आर्यमाला, आरवमाला मुकारी, पासी, माला मस्ती ) 2011 च्या जनगणना अहवालाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील काही जातींची लोकसंख्या अतिशय तुरळक दिसून येत आहे. या सर्व बाबी विचाराधीन घेऊन सदर संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे अनुसूचित जातीच्या यादीतील सर्व जातींची माहिती सामाजिक विकासाच्या विविध निर्देशाकांच्या आधारे संकलित करण्यात येणार असून शासनास याद्वारे धोरणात्मक सुचना करण्यात येणार आहे.

2011 च्या जनगणना अहवालानुसार काही जातींचे वास्तव्य जिल्ह्यानिहाय संकलित करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार अतिशय कमी दिसते. उदा अगेर जातीचे वास्तव्य पुण्यामध्ये 48 व्यक्ती असे आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यामध्ये अशा 48 व्यक्तीचे वास्तव्य शोधणे हि अतिशय आव्हानात्मक बाब असून या संशोधन प्रकल्पाची मर्यादा आहे. तसेच अशा जातींची नोंद चुकीची झाल्यामुळे, यांचा उगम व इतिहास याबाबत लिखित दस्तावेज नसल्यामुळे अशा अनेक कारणांमुळे सदर जातींना जाती प्रमाणपत्र मिळताना व जाती पडताळणी करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या अभ्यासातून या समस्यांचा वेध घेण्यात येणार आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा घेत असताना अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये समाविष्ट असणारे महार, मांग, चांभार, मेहतर, या समाजाचे अनेक संशोधन अभ्यास झालेले दिसून येतात. तथापि अनेक जाती अशा आहेत ज्यांचा अभ्यास झालेला नाही. अशा जातींच्या व्यक्तींनी त्यांच्या संस्था, संघटना, समाज विकास मंडळ, वास्तव्य बाबतची माहिती उपलब्ध करून दिल्यास या जातींच्या व्यक्तींपर्यंत पोहचून या समाजाचा अभ्यास करण्यात मदत होईल.

अशा प्रकारचा 59 जातींचा समावेश करून प्रथमच अभ्यास होत असून यामुळे समाजाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात यांना आणण्यास मदत होणार आहे याचबरोबर तयार होणारे लिखित दस्तावेजचा उपयोग जात पडताळणी समिती व भावी संशोधकांना होणार आहे. 59 जातींपैकी अनेक जातींचे अस्तित्व धोक्यात असून काही जाती समूळ नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, अशा जातीच्या प्रतिनिधीनी आपल्या समाजासंदर्भातील सर्व उपलब्ध माहिती बार्टी कार्यालयास उपलब्ध करून द्यावी असे आवाहन मा. राजेशजी ढाबरे, महासंचालक, बार्टी, पुणे यांनी केले आहे.

प्रसिध्दी विभाग, बार्टी, पुणे